# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

फोन ०२०-२५६०१२१३
फॅक्स ०२०-२५६०१२०६
website : www.unipune.ac.in

गणेशखिंड,
पुणे – ४११ ००७
email : st-arts@pun.unipune.ac.in

संदर्भ : परीक्षा/ बी.ए./एम.ए./ 830 दि. १४.०७.२०१८ 15

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्न कला महाविद्यालये

विषय : एम.ए. एप्रिल/मे,, २०१८ च्या परीक्षेच्या निकालाबाबत

महोदय/महोदया,

एप्रिल/मे,२०१८ मध्ये घेण्यात आलेल्या एम.ए. परीक्षेचा निकाल मंगळवार, दिनांक ०३.०७.२०१८ रोजी जाहीर करण्यात आलेला आहे. परीक्षेची गुणपत्रके खालीलप्रमाणे वितरित करण्यात येतील.

१. पुणे शहरातील व पुणे जिल्हयातील महाविद्यालयांनी सोमवार, दिनांक १६.०७.२०१८ रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत परीक्षा विभागातून गुणपत्रके घेवून जायची आहेत.

२. नाशिक जिल्हयातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके संबंधित विद्यापीठ उपकेंद्रातून सोमवार, दिनांक १६.०७.२०१८ रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत घेवून जायची आहेत.

३. अहमदनगर जिल्हयातील महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके संबंधित विद्यापीठ उपकेंद्रातून सोमवार, दिनांक १६.०७.२०१८ रोजी सकाळी ११.०० ते ५.०० या वेळेत घेवून जायची आहेत.

४. अहमदनगर जिल्हयातील अकोले, राहाता, कोपरगाव आणि संगमनेर तालुक्यातील सर्व महाविद्यालयांनी त्यांच्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके संगमनेर नगरपालिका आर्टस डी.जे.मालपाणी कॉमर्स आणि बी.एम.सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर येथून सोमवार, दिनांक १६.०७.२०१८ रोजी सकाळी ११.०० ते ५.०० या वेळेत घेवून जायची आहेत.

आपल्या महाविद्यालयामार्फत उपरोक्त परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची गुणपत्रके संबंधित विद्यार्थ्यांना देण्याची व्यवस्था करावी. त्याचप्रमाणे एखादया विद्यार्थ्याच्या गुणपत्रकामध्ये काही दोष अथवा त्रुटी आढळल्यास विद्यार्थ्यांना परस्पर विद्यापीठात न पाठविता, महाविद्यालयाच्या प्रतिनिधीमार्फत अशी प्रकरणे तातडीने विद्यापीठाच्या परीक्षा विभागात एकत्रित आणून द्यावीत. त्यानंतर त्यातील दुरुस्त्या त्वरित करुन घेण्याबाबत कार्यवाही करता येईल.

आपणास विनंती करण्यात येते की, उपरोक्त नमूद केल्यानुसार आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा निकाल वेळेत घेवून जाण्याची व वितरण करण्याची व्यवस्था करावी.

कळावे.

आपला,

उपकुलसचिव,
(परीक्षा)

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी –

१. विद्यापीठ उपकेंद्र प्रमुख, नाशिक/अहमदनगर यांनी सदर निकाल संबंधित महाविद्यालयांना देण्याची व्यवस्था करावी.

२. मा. प्राचार्य, संगमनेर नगरपालिका आर्टस, डी.जे.मालपाणी कॉमर्स आणि बी.एम.सारडा विज्ञान महाविद्यालय, संगमनेर यांनी सदर निकाल संबंधित महाविद्यालयांना देण्याची व्यवस्था करावी.